# नवजात शिशु अतिदक्षता विभागाचे वैद्यकीय शिक्षणमंत्री गिरीष महाजन यांच्या हस्ते लोकार्पण



पुणे : राज्यातील सर्व शासकीय रुग्णालयामध्ये पथदर्शी ठरणाऱ्या पुणे येथील बी.जे. वैद्यकीय महाविद्यालय व ससून सर्वोपचार रुग्णालयमध्ये ५९ खाटांची सुविधा असलेल्या अत्याधुनिक नवजात शिशु अतिदक्षता विभागाचे वैद्यकीय शिक्षणमंत्री गिरीष महाजन यांच्या हस्ते उदघाटन करण्यात आले. यावेळी पुणे जिल्हयाचे पालकमंत्री गिरीश बापट व सामाजिक न्याय राज्यमंत्री दिलीप कांबळे, खासदार अनिल शिरोळे, दगडुशेठ हलवाई गणपती ट्रस्टचे अध्यक्ष अशोक गोडसे हे कार्यक्रमास उपस्थित होते.

महाजन म्हणाले की, महाराष्ट्र राज्यातील सर्व शासकीय रुग्णालया पैकी ससून सर्वोपचार रुग्णालय हे पहिले अद्यायावत रुग्णालय आहे. सर्वसामान्य जनतेला व पालकांना त्यांच्या नवजात बालकास तातडीने उपचार मिळण्यासाठी नक्कीच या विभागाची मदत हाईल असे ते यावेळी म्हणाले.

बी.जे. वैद्यकीय महाविद्यालय व ससून सर्वोपचार रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. अजय चंदनवाले यांनी प्रास्तविक केले. त्यावेळी ते म्हणाले की, ससन सर्वोउपचार रुग्णालयाची सर्वसामान्यांचे रुग्णालय म्हणून ओळख आहे. येथे उपचारासाठी येणाऱ्या गरीब,कष्टकरी सर्वसामान्य जनतेसाठी येथे औषधोपचार दिले जातात. नवजात बालकांना विविध आजारावर तातडीने उपचार होण्यासाठी अतिदक्षता विभागामध्ये दाखल करावे लागते. खाजगी रुग्णालयामध्ये उपचारासाठी होणारा खर्च सर्वसामान्यांना न परवडणारा असतो. त्यामळे अत्याधुनिक सेवा सुविधा सर्वसामान्य जनतेस उपलब्ध व्हाव्यात या हेतूने विविध व्यावसायिक कँमन्यांनी त्यांचे व्यावसायिक, सामाजिक जबाबदारी सी.एस.आर प्रकल्पाच्या मार्फत दानस्वरुपात निधी उपलब्ध करुन शिशु अतिदक्षता विभाग सुरु करण्यात आला आहे. तसेच अत्याधुनिक सुविधा,डॉक्टर्स व प्रशिक्षित नर्सेस यांची २४ तास सेवा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

यावेळी पालकमंत्री गिरिश बापट, सामाजिक न्याय राज्यमंत्री दिलीप कांबळे, खासदार अनिल शिरोळे, यांनीही समयोचित भाषणे केली. यावेळी कार्यक्रमास डॉक्टर्स,अधिकारी,कर्मचारी मोठया संख्यने उपस्थित होते.